जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

27 OCT 2017
सकाळ

# ‘फोटोकॉपी’ मिळणार विद्यार्थ्यांच्या ई-मेलवर

## वेळखाऊ प्रक्रियेला बगल : पंधरा लाखांची बचत; प्रायोगिक तत्त्वावर सुरवात

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी मिळण्यातील अडचण दूर केली आहे. यंदापासून ऑनलाइन पीडीएफ स्वरूपात फोटोकॉपी विद्यार्थ्यांच्या थेट ई-मेलवर पाठवली जाणार आहे. फोटोकॉपी पाठविण्याच्या वेळखाऊ प्रक्रियेला बगल देत विद्यापीठाने घेतलेला हा निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताचा ठरणार आहे. फोटोकॉपीसाठी विद्यार्थ्यांना पंधरा ते वीस दिवस वाट पाहण्याची गरज उरणार नाही. या निर्णयाचा परिणाम म्हणून विद्यापीठाची सुमारे पंधरा लाख रुपयांची बचत होणार आहे. प्रायोगिक तत्त्वावर फार्मसीच्या ४५६ विद्यार्थ्यांना ऑनलाइन फोटोकॉपीज पाठविण्यात आल्या.

मार्च-एप्रिल व ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील परीक्षांनंतर सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांकडून फोटोकॉपीची मागणी केली जाते. एका विद्यार्थ्याला दोन विषयांच्या फोटोकॉपी मिळतात. एका फोटोकॉपीसाठी दीडशे रुपये शुल्क आकारले जाते. त्यानंतर परीक्षा विभागातर्फे त्याला पोस्टाद्वारे फोटोकॉपी पाठवली जाते. ती वेळेवर मिळाली नाहीतर विद्यार्थी पाय आपटतच परीक्षा विभागाच्या पायऱ्या चढतो आणि संबंधितांवर प्रश्नांचा भडिमार करतो. वेळेत फोटोकॉपी मिळाल्यास विद्यार्थ्याला जर पुनर्मूल्यांकन करायचे असल्यास त्याचा निर्णयही पटकन घेता येतो आणि पुनर्मूल्याकंनासाठी अर्ज करतो. तो एका विषयाच्या पुनर्मूल्यांकनासाठीचे पाचशे रुपये शुल्क भरतो.

पान २ वर »

### पोस्टमनची वाट पाहावी लागणार नाही

**परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले, "अभियांत्रिकी, लॉ व फार्मसीच्या विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात फोटोकॉपीची मागणी होत असते. त्यांना वेळेत फोटोकॉपी मिळावी, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला फोटोकॉपीसाठी पोस्टमनची वाट पाहावी लागणार नाही. तंत्रज्ञानात्मक प्रक्रियेचा फायदा विद्यार्थ्याला होणार आहे."**

### दृष्टिक्षेपात

- **प्रत्येक सेमिस्टरनंतर सुमारे आठ हजार विद्यार्थ्यांकडून फोटोकॉपीची मागणी**
- **तीस हजार फोटोकॉपींचे विद्यापीठाकडून होते वितरण**
- **फोटोकॉपी विद्यार्थ्यांच्या ई-मेलवर मिळणार**
- **विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर फोटोकॉपीचा मेसेज मिळणार**
- **वेळखाऊ प्रक्रियेला आळा बसणार**



## ‘फोटोकॉपी’ मिळणार विद्यार्थ्यांच्या ई-मेलवर

» पान १ वरून

पण, प्रवेश प्राक्रिया झाल्यानंतर जर पुनर्मूल्यांकनात संबंधित विषयात उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्णतेची माहिती मिळाल्यास त्याचा पारा चढतो. विद्यार्थ्यांची ही कटकट कमी व्हावी, यासाठी परीक्षा विभागाने फोटोकॉपी विद्यार्थ्याला ऑनलाईन पाठविण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यार्थ्याला फोटोकॉपी मिळण्यासाठी साधारणपणे पंधरा दिवस लागतात. परीक्षा विभाग पोस्टाद्वारे विद्यार्थ्याच्या पत्त्यावर फोटोकॉपी पाठवतो. मात्र, आता थेट विद्यार्थ्यांच्या ई-मेलवर उत्तरपत्रिका पाठवली जाणार आहे. त्याचा एसएमएस विद्यार्थ्याला मोबाईलवर पाहायला मिळणार आहे. ई-मेलवर फोटोकॉपी मिळाल्यानंतर विद्यार्थी ती मोबाईलवरही पाहू शकतो. तसेच पुनर्मूल्यांकन करायचे की नाही, याचाही निर्णय त्वरित घेऊ शकतो. जागा भाडे, विद्युत कर, उत्तरपत्रिकेचे झेरॉक्स, प्रशासकीय असा एकूण खर्च लक्षात घेतला, तर विद्यापीठाला या निर्णयाने फायदा होणार आहे. विशेष म्हणजे ई-मेलवर उत्तरपत्रिका पाठवून पर्यावरणाचा विचारही करण्यात आला आहे. फोटोकॉपीच्या झेरॉक्ससाठी वापरल्या जाणाऱ्या कागदावरील खर्च वाचणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017
Times of India

# SUK may soon invite permanent affiliation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** D T Shirke, the pro-VC of Shivaji University, Kolhapur (SUK), said the university will be inviting the applications for permanent affiliation in the next few weeks.

Shirke said 142 colleges, out of 283, are permanently affiliated with the SUK and more are keen to upgrade their status. He added the permanent affiliation is crucial as it enables a college to draw University Grants Commission (UGC) funds under various schemes. The affiliation also provides academic and financial stability to a college.

Generally, colleges are given affiliation on a temporary basis, which must be renewed periodically. However, once the college has completed six years from its foundation date, it can apply for the permanent affiliation status.

"For permanent affiliation, a college must meet certain criteria. Be it infrastructure or academics, the college's performance must be top-notch," Shirke added.

Another SUK official said the colleges must apply for the permanent affiliation status directly to the university. Based on facts and figures, the university will decide if the college is eligible for permanent affiliation or not.

File Photo



Colleges must apply for permanent affiliation status directly to the SUK

If the college qualifies for the affiliation, then a local inquiry committee is sent to the college campus, where its track record, academic and administrative efficiency, participation in extracurricular activities etc. are assessed.

The official added that affiliation is important when it comes to establishing infrastructure and other development initiatives. A permanent affiliation sets the college free from the annual time-consuming ritual of visits by the varsity's local inquiry committee for renewal of the temporary affiliation. It also shows that the college is moving in right direction.

Earlier, D R More, the former director of Board of Colleges and University Development (BCUD), SUK, had said the number of permanently affiliated colleges have gone up in last 10 years.

"We had relaxed a few stringent norms, so that all the colleges that are willing to improve their academic records and become a part of the permanent affiliation club, can do so," he had added.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# 'सिनेट'साठी ७२० अर्जांची विक्री

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या (सिनेट) सदस्यत्वासाठी १७ नोव्हेंबरला होणाऱ्या निवडणुकीसाठी अर्ज विक्रीच्या चार दिवसात ७२० अर्जांची विक्री झाली. सोमवार (ता.२३) पासून अर्ज विक्रीला सुरुवात झाली होती. गेल्या चार दिवसांत नोंदणीकृत पदवीधर गटातून दोन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर असून, ४ नोव्हेंबरपर्यंत माघारीची मुदत आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, दहा महाविद्यालयीन शिक्षक प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी आणि दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी निडणुकीद्वारे निवडण्यात येणार आहेत. यातील राखीव जागांच्या आरक्षणाबाबतचा तपशील निवडणूक सूचनेमध्ये देण्यात आला आहे. विद्यापीठातील एकूण चार विद्या शाखांतर्गत ४५ अभ्यास मंडळे आहेत. यातील प्रत्येक अभ्यास मंडळासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून तीन विभागप्रमुखांची निवड केली जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017
लोकमत

# अधिकार मंडळासाठी दोन अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांसाठीच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाली आहे. या निवडणुकीतील नोंदणीकृत पदवीधर गटामध्ये गुरुवारी दोन अर्ज दाखल झाले आहेत.

अधिसभा, विद्या परिषद, विविध विद्याशाखांच्या एकूण ४७ अभ्यास मंडळांवरील १८८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. अधिसभेसाठी शिक्षक, प्राचार्य आणि नोंदणीकृत पदवीधर गटाकरिता प्रत्येकी दहा जागा, संस्था प्रतिनिधींच्या सहा, विद्यापीठ कॅम्पसवरील शिक्षकांच्या तीन जागा, विद्या परिषदेसाठी शिक्षक गटातील आठ जागा, विविध विद्याशाखांच्या एकूण ४७ अभ्यास मंडळांवरील प्रत्येकी तीन अशा एकूण १४१ जागांचा समावेश आहे. या सर्व जागांसाठी दि. १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. निडणूक प्रक्रिया सोमवारी (दि. २३) पासून सुरू झाली. गुरुवारपर्यंत एकूण ७२० अर्जांची विक्री झाली आहे. नोंदणीकृत पदवीधर गटात गुरुवारी सायंकाळपर्यंत दोन अर्ज दाखल झाले आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 7 OCT 2017
पुण्यनगरी

# सिनेटसाठी ७२० अर्जांची विक्री

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या सदस्यत्वासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी गुरुवारपर्यंत चार दिवसांत एकूण ७२० अर्जांची विक्री करण्यात आली आहे. गुरुवारी दिवसभरामध्ये २४० अर्जांची विक्री करण्यात आली. अभिसभा, विद्या परिषद, आणि अभ्यास मंडळांसाठी येत्या १७ नोव्हेंबरला मतदान, तर २० नोव्हेंबरला मतमोजणी केली जाणार आहे.

सोमवार, १६ ऑक्टोबरपासून अर्ज विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. अर्ज विक्रीच्या पहिल्या दिवशी १५०, दुसऱ्या दिवशी २९०, तिसऱ्या दिवशी ४० अर्ज विकले होते. गुरुवारी २४० अर्ज विकण्यात आले. अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ ऑक्टोबर आहे. त्यामुळे पुढील दोन दिवसांत अर्ज विक्रीची आकडेवारी वाढण्याची शक्यता आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज माघारीची मुदत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017

तरुण भारत

# विद्यापीठ अधिसभेसाठी ३३ केंद्रांवर मतदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अधिसभेची निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यात ३३ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात ११ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तर कोल्हापूर शहरात सायबर कॉलेज, शहाजी कॉलेज, कॉमर्स कॉलेज या तीन केंद्रावर मतदान होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

उमेदवारी अर्ज भरण्यापासून ते निकालापर्यंतचा आराखडा विद्यापीठाने तयार केला आहे. मतदान सुरळीत पार पाडून विद्यापीठाला सहकार्य करण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी सर्वच संघटना व मतदारांना केले आहे.

**विद्यापीठ निवडणुक पदवीधरसाठी दोन अर्ज**

शिवाजी विद्यापीठ अधिसभा



निवडणुकीसाठी चौथ्या दिवसापर्यंत एकूण ७२० अर्जांची विक्री झाली. तर गुरूवारी पदवीधरसाठी २ अर्ज विद्यापीठ प्रशासनाकडे जमा झाले आहेत. अधिसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून ३१ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरावयाचे आहेत. २ नोव्हेंबरला उमेदवारी अर्जांची छाननी तर ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्ज माघार घेण्याची अंतिम मुदत आहे. चौथ्या दिवसापर्यंत संस्थापक, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी यांच्याकडून एकही उमेदवारी अर्ज जमा झालेला नाही. अर्ज भरावयास अवघे पाच दिवस राहिल्याने लवकरात लवकर अर्ज जमा करण्यासाठी संघटना प्रयत्नशील आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017
पुढारी

# नोंदणीकृत पदवीधर गटात दोन अर्ज

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी नोंदणीकृत पदवीधर गटात दोन उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. आजअखेर ७२० उमेदवारी अर्जांची विक्री झाली आहे.

## विद्यापीठ निवडणूक

विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी सोमवारपासून (दि.२३) अर्ज विक्री सुरू आहे. विद्यापीठाच्या निवडणुका महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार घेण्यात येणार आहेत. त्यानुसार अधिसभेसाठी दहा प्राचार्य, सहा व्यवस्थापन संस्था प्रतिनिधी, तीन विद्यापीठ शिक्षक प्रतिनिधी, दहा नोंदणीकृत पदवीधरांचे प्रतिनिधी आदी निवडले जाणार आहेत. विद्या परिषदेवर प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक प्रतिनिधी, प्रत्येक अभ्यास मंडळासाठी तीन महाविद्यालयीन विभागप्रमुखांची निवड होणार आहे. अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑक्टोबरपर्यंत तर अर्ज माघारीची मुदत ४ नोव्हेंबरपर्यंत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 OCT 2017
पुढारी

# ट्रायथ्लॉन, ड्यूथ्लॉन स्पर्धा रविवारी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर स्पोर्टस् क्लबच्या वतीने 'क्रीडानगरी'मध्ये यंदा प्रथमच ड्यूथ्लॉन आणि ट्रायथ्लॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी (२९ ऑक्टोबर) सकाळी ६ वाजता या स्पर्धेचे उद्घाटन पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते व दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. शिवाजी विद्यापीठासमोरील राजाराम तलाव येथे ही स्पर्धा होणार आहे.

**■ पालकमंत्री चंद्रकांत पाटील, पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन**

या स्पर्धेला खेळाडूंचा अभूतपूर्व सहभाग मिळाला आहे. देशभरातील एक हजारांहून अधिक स्पर्धकांची नोंदणी झाली आहे. ॲडव्हेंचर स्पोर्टसमधील ड्यूथ्लॉन आणि ट्रायथ्लॉन स्पर्धेची क्रेझ संपूर्ण जगात दिवसेंदिवस वाढत आहे. क्रीडानगरी कोल्हापुरातील खेळाडूंनीही या खेळात आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला दबदबा निर्माण केला आहे. अशा या खेळाचा प्रचार व प्रसार संपूर्ण भारतभर झपाट्याने होत आहे. कोल्हापुरातही या खेळाला अल्पावधीत लोकप्रियता मिळाली आहे. यंदा प्रथमच कोल्हापुरात या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ७ ऑक्टोबर ही सहभाग नोंदणीची तारीख होती. त्यानुसार देशभरातील सुमारे एक हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे. स्पर्धेत पश्चिम महाराष्ट्रातील आयपीएस अधिकारी, डॉक्टर, इंजिनिअर्स, तसेच लहान मुलांचा यामध्ये सहभाग आहे.

दरम्यान, स्पर्धेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. स्पर्धेचे संयोजन अध्यक्ष चेतन चव्हाण, उपाध्यक्ष डॉ. विजय कुलकर्णी, सचिव उदय पाटील, वैभव बेळगावकर यांच्यासह कार्यकर्ते करत आहेत.

27 OCT 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मंडलिक महाविद्यालयास विजेतेपद

## विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा: फ्रीस्टाईलमध्ये कळे अव्वल

**मुरगूड : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धा सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय मुरगूड येथे नुकत्याच झाल्या. यामध्ये ग्रीको रोमन कुस्ती प्रकारात मंडलिक महाविद्यालयास व फ्रीस्टाईल कुस्ती प्रकारात कळेच्या विठ्ठलराव पाटील महाविद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद मिळाले.

शिवाजी विद्यापीठाचा ग्रीको रोमन कुस्ती स्पर्धेचा संघ अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कुस्ती स्पर्धेसाठी प्रथमच सहभागी होत आहे. त्या संघाची निवड या स्पर्धेतून करण्यात आली.



मुरगूड : विजेत्या कुस्तीपटूंना शिल्ड देताना मान्यवर.

ग्रीको रोमन (पुरुष), फ्रीस्टाईल (पुरुष) व फ्रीस्टाईल (महिला) या कुस्ती स्पर्धांचा निकाल असा : ग्रीको रोमन (मुले) ५५ किलो प्रथम - संतोष हिरुगडे (मंडलिक महाविद्यालय मुरगूड), ६० किलो प्रथम - विजय ढेरे (आनंदराव नाईक महाविद्यालय चिखली), ६३ किलो प्रथम-प्रताप पाटील (शहाजी कॉलेज कोल्हापूर), ६७ किलो प्रथम-वैभव यादव (दूधसाखर महाविद्यालय बिद्री) ७२ किलो प्रथम -सचिन खोत (केपीएससी कॉलेज सांगली), ७७ किलो प्रथम - गणेश डेळेकर (वाय. डी. कॉलेज यवलूज), ८२ किलो प्रथम - ऋषिकेश पाटील (भोगावती महाविद्यालय कुरुकली), ८७ किलो प्रथम- रोहन रंडे (मंडलिक महाविद्यालय मुरगूड) ९७ किलो प्रथम-सुशांत जाधव (शजाजी कॉलेज कोल्हापूर), १३० किलो प्रथम- शंकर चौगले (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर).

फ्रीस्टाईल (मुले) ५७ किलो - प्रथम - विक्रम मोटे (कळे महाविद्यालय), ६१ किलो प्रथम - सौरभ पाटील (भोगावती महाविद्यालय), ६५ किलो प्रथम - सागर थोरात (ए. पी. पाटील महाविद्यालय सांगली), ७० किलो प्रथम - संतोष गावडे (नागनाथअण्णा कॉलेज सटे), ७४ किलो प्रथम - विशाल सरगे (एल. बी. कॉलेज मेसवड), ८६ किलो प्रथम - भैरू माने (स. बा. खाडे महाविद्यालय कोल्हापूर), ९२ किलो वजन गट - विक्रम शेटे (इचलकरंजी) ९७ किलो वजन गट प्रथम - नीलेश लोखंडे (जगताप वाघोली कॉलेज), १२५ किलो प्रथम - शुभम सिदनाळे (नाईट कॉलेज इचलकरंजी)

फ्रीस्टाईल (मुली) ५० किलो प्रथम - स्वाती शिंदे (मंडलिक महाविद्यालय), ५३ किलो प्रथम - नंदिनी साळोखे (मंडलिक महाविद्यालय), ५५ किलो प्रथम- काजल इंगळे (मुधोजी कॉलेज फलटण), ५९ किलो प्रथम - जस्मीन शेख (शिवाजी कॉलेज सातारा), ६२ किलो प्रथम - स्मिता माळी (कला वाणिज्य महाविद्यालय पलूस), ६५ किलो प्रथम - प्रियांका डुबुळे (आदर्श कॉलेज विटा), ६८ किलो प्रथम अपूर्वा पाटील (इंजिनिअरिंग कॉलेज बुधगाव), ७२ किलो प्रथम सुकन्या खामकर (शिवराज कॉलेज गडहिंग्लज), ७६ किलो प्रथम - स्वाती पाटील (केव्हीपी इस्लामपूर).

या स्पर्धेचे पंच म्हणून पै. उत्तमराव पाटील, संभाजी वरुटे, संभाजी पाटील, बबन चौगले, बाळू मेटकर, प्रकाश खोत, प्रवीण मांगोरे यांनी काम पाहिले.